ग्रामपंचायत निवडणुका-
निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कामाकाजाचे
स्थान निश्चिती ठरविण्याबाबत स्थायी आदेश.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/स्था.आ./प्र.क्र.५/का-८

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०१/०६/२०१७

भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका, त्यांची मुदत संपण्यापूर्वी घेणे राज्य निवडणूक आयोगावर बंधनकारक आहेत. राज्यामध्ये सुमारे २८ हजार ग्रामपंचायतींसाठी दर ५ वर्षात २.५ लाख पेक्षा जास्त सदस्य निवडून दिले जातात. ह्या निवडणुकांमध्ये ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, अव्वल कारकून या स्तराचे अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करतात व एका निवडणूक अधिकाऱ्याकडे २ ते ३ ग्रामपंचायतींची जबाबदारी देण्यात येते. सन २०१५ मध्ये पार पडलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये काही जिल्ह्यांमध्ये ३०० ते ४०० निवडणूक निर्णय अधिकारी नेमण्यात आले होते. मोठ्या संख्येने नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकारी यांना आवश्यक त्या सर्व साधनसामग्री पुरविण्यासाठी व त्यांच्या कामावर सुसूत्रता/संनियंत्रण ठेवण्यासाठी सर्वसाधारणपणे त्यांच्या बसण्याची व्यवस्था तहसिल कार्यालयामध्येच करण्यात येते.

२. राज्य निवडणूक आयोगाने गेल्या २ वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांमध्ये संगणकाचा व नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची सुरूवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून नुकत्याच झालेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे पूर्णत: संगणकाच्या सहाय्याने भरण्यात आली होती. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्येसुध्दा संगणकाचा व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे, लोकशाही सुदृढ करण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. म्हणून सर्व बाबींचा विचार करून आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

## आदेश

i. येथून पुढे होणाऱ्या सर्व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नेमण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांची बसण्याची व्यवस्था शक्यतो तहसिल कार्यालयामध्येच करण्यात यावेत. तहसिल कार्यालयामध्ये बसूनच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे स्वीकारावेत.

ii. संबंधित तहसिलदार यांनी वरीलप्रमाणे नेमण्यात आलेल्या सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना आवश्यक त्या सर्व सुविधा (उदा.संगणक, इंटरनेट कनेक्टीव्हीटी, हेल्प डेस्क इत्यादी) पुरविण्यात याव्यात.

iii. ज्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांना वरीलप्रमाणे तहसिल कार्यालयामध्ये बसणे शक्य नसेल, त्या बाबत राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी. मात्र या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय स्थापन करताना तेथे संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील.

iv. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये उभे राहणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे सहज रितीने भरता यावे, यासाठी तहसिल कार्यालयामध्ये उपलब्ध सर्व व्यवस्थेचा वापर करण्यात यावा. उदा. महा ई-सेवा केंद्र, सेतू इत्यादी.

v. या कामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व गटविकास अधिकारी यांनी जिल्हाधिकारी/ तहसिलदार यांना आवश्यक ती सर्व मदत करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

Anawade 01/6/17

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
मा. जिल्हाधिकारी (सर्व),
मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून.

प्रत माहितीस्तव:-

१. मा. सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र शासन.
२. मा. विभागीय आयुक्त (सर्व)
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
५. स्थायी आदेश संचिका